Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# महात्मा ज्योतिराव फुले यांचे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचार

**किशोर लक्ष्मण साळवे**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**प्रस्तावना:-**

जोतीराव फुले यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विषयावर विचार मांडून प्रत्यक्ष कार्य केले .हे त्यांच्या सामाजिक क्रांतीचे अतिशय महत्वाचे अंग आहे नवसमाजाला दिशा देणे नवसमाजनिर्मिती हेच त्यांचे साध्य होते समकालीन सुधारक जेव्हा उच्चवर्णीय व शहरी मध्यमवर्गीयांच्या कौटुंबिक सुधारणांवर भर देत होते.तेव्हा ज्योतीबांनी तळागाळातील शोषित स्त्री शूद्रातिशूद्रांच्या सामाजिक प्रश्नांना हात घातला त्यांनी शोषण प्रधान समाजव्यवस्था मुळासकट उखडून फेकून त्या जागी स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यावर आधारित समाज रचना निर्माण केली. तसेच जुन्या समाज रचनेला पुष्टी देणाऱ्या सर्व अंधश्रद्धांचा पर्दाफाश त्यांनी केला. जाती विभाजन व उच्चनीचता, उच्चवर्णीय यांचे विशेषाधिकार अंधश्रद्धांना खतपाणी अशा अनिष्ट स्वरूपात होतांना ज्योतिरावांना दिसत होते. महात्मा फुले म्हणतात, कोणत्याही अंधश्रद्धेला केवळ मनोविकृती समजून ती तिचा कधीच प्रतिवाद करीत नाहीत अंधश्रद्धांचे अस्तित्व माणसाच्या मनात खोलवर रुजलेल्या भ्रमामध्ये आणि गैरसमजा मध्ये असते हे खरे असले तरी केवळ मने साफ करून ते संपणार नाही अंधश्रद्धांना बळी पडलेल्यांना महात्मा फुलेंनी हितोपदेश केला पण त्यांना मूर्ख मागासलेले व वेडगळ ठरवून त्यांच्यावर तोंडसुख मात्र कधीच घेतली नाही.ज्या समाज व्यवस्थेने त्यांना निरक्षर अज्ञानी आणि दरिद्री ठेवले त्या समाजव्यवस्थेवर ज्योतीरावांचा राग होता तिच्यावर त्यांनी घणाघाती घणाघाती प्रहार केले. केवळ विकृतीवर हल्ला करून न थांबता त्या विकृतींना प्रतिष्ठा देणाऱ्या सर्वच बाबी त्यांनी टीकास्पद ठरविल्या धर्मग्रंथाचे अपौरुषत्व व प्रामाण्य प्रश्नांकित केले. विषम, जीर्ण, शोषण पर समाजव्यवस्थेच्या ठिकाणी तेव्हा समतावादी नव मूल्यावर आधारीत नवा समाज उभा राहील तेव्हाच अंधश्रद्धांचे समूळ उच्चाटन होऊ शकेल अशी जोतीरावांची धारणा होती.[1]

अंधश्रद्धा मुळे स्त्री शूद्रातिशूद्रावर अनेक अनिष्ट परिणाम होतात ते लुबाडले पुरविली तर जातातच शिवाय दैववादी व क्रिया शून्य होतात असा व्यापक विचार महात्मा फुले मांडतात. दुसरे असे

की, सामाजिक विषमताना व विकृतींना स्वाभाविक नैसर्गिक म्हणून त्याचा निमुट स्वीकार करतात. सर्वांगीण शोषण सहन करतात. शास्त्रीय मार्गाचा अवलंब करण्याचे टाळून ते प्रसंगी आत्मघातही ओढवून घेतात. ही सगळी अरिष्ट मालिका लक्षात ठेवूनच ज्योतिरावांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात हात घातला आहे. उपदेश, शिक्षण व पर्यायी आचार-विचार दिल्यानंतरही लोका लोकां भोवतीची सामाजिक आर्थिक परिस्थिती जर तशीच राहिली तर अंधश्रद्धांचा नायनाट होणार नाही हे ओळखून ते या कार्यासोबतच दारिद्य निराकरण व शोषणमुक्ती यांच्याही उपक्रमाची अंमलबजावणी सत्यशोधक समाजामार्फत करतात.धर्माच्या नावाने समाजात सुरू असलेल्या अनेक उपप्रकार यांचा ज्योतिरावांनी जाहीर निषेध केला होता. प्रारब्ध, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, मरणोत्तर सद्गती दुर्गति, कर्म विपाक इत्यादी कल्पना मधील फोलपणा त्यांनी अनेक प्रसंगांना टिकवण्यात आलेले निरर्थक आणि शोषणकारी कर्मकांड, मूर्तिपूजा, फलज्योतिष, बुवाबाजी अवतार कथा यांच्यावर ज्योतिरावांनी केलेले तार्किक व व्यवहारिक प्रहार आजही उदबोधक ठरावेत असे आहेत. फलज्योतिष हे शास्त्र आहे किंवा आकाशातील ग्रह गोलाच्या स्थिती गतीमुळे मानव मात्रास पीडा होऊ शकते मात्र ग्रह शांती केल्यास ती टाळताही येते वगैरे कल्पनावर ज्योतीरावांचा विश्वास नव्हता.

सर्व चराचर सृष्टीचा निर्माता व नियंता असा एकच “निर्मिक” असून सर्व स्त्री-पुरुष मनुष्यमात्र ही त्याचीच लेकरे आहेत तो सर्वांचा पोशिंदा, न्यायकर्ता व उद्धारक आहे अशी श्रद्धा ज्योतिराव बाळगून होते. आराधना, भक्ती, पूजा, नैवेद्य, नवससायास, जपतप, अनुष्ठान वगैरे सर्वच गोष्टींचा त्यांनी निषेध केला. प्रार्थनेला त्यांचा विश्वास असला तरी मूर्तीपूजेला ते विरोध करतात. कर्मकांडांना ज्योती रावाचा विरोध होताच परंतु जन्म, विवाह, ऋतूशांती, वास्तुशांती, प्रेतसंस्कार, श्राद्ध वगैरे विधी मधील तर्कदुष्टपणा आणि इच्छुकांची त्यामागचे पोटार्थी हेतू जोतिरावांनी वारंवार स्पष्ट केले. बालकांच्या जन्मवेळी आकाशात असलेल्या ग्रह दिशेनुसार बालकाच्या नावाची मुळाक्षरे ठरविणे आणि त्या मूळाक्षरावरून जन्मपत्रिका मांडून त्याच्या भावी आयुष्यात संभव नाऱ्या लाभा लाभांची वर्तविणे हा प्रकार ज्योतिरावांना शुद्ध ठकबाजीचा वाटतो. स्वतःला परमेश्वराचे अवतार म्हणून समाजात वावरणारे चमत्कार सिद्धीचा दावा करणारे, बुवा बाबा, महाराज, स्वामी, अशा नावाने ओळखले जाणारे बनावट लफंगे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला आव्हान देत असतात ज्योतिरावांनी या ढोंगी गुरुबाजीचा खरपूस समाचार घेतला आहे.

निर्मिकाचे स्मरण मानवाने विशुद्ध स्वरूपातच करावे त्यास कोणत्याही मानवी व भौतिक आकार देऊ नये यावर ज्योतिरावांना कटाक्ष होता. निर्मिकाचे प्रत्यक्ष दर्शन किंवा साक्षात्कार माणसाला घडूच शकत नाही तेव्हा देव दर्शनाची कोणी आस बाळगणे किंवा आपल्याला ते झाली असल्याचे सांगत सुटणे ही ज्योतिरावांनी शुद्ध वेडेपणाची व थापड पणाची उदाहरणे ठरविली आहेत.ज्योतिराव

म्हणतात, भक्तांना ईश्वरापर्यंत नेण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज नसते धंदेवाईक वकीला प्रमाणेच या ढोंगी गुरूंना त्यांनी तिरस्करणीय ठरविले आहे. मानवी शरीरात कुंडलिनी चक्र दाखवून आणि त्याद्वारे प्रत्यक्ष ईश्वर दाखविण्याच्या पोकळ गप्पा मारणारे आणि देवांच्या नावाने आश्रम काढणारे हे बुवा प्रत्यक्षात पाखंडी असतात. मंत्रतंत्र, चमत्कार करणारे भोंदू मग ते ब्राम्हण असोत की ब्राह्मणेतर असोत जोतीरावांनी त्यांना सारखेच धारेवर धरले आहे. समाजात बुवा बाबांची पैदास कशी होते याचे मर्मग्राही विश्लेषण त्यांनी "शेतकऱ्यांचा आसूड" मध्ये केले. धर्म, मंत्रतंत्र, जादूटोणा, योगासने, भविष्यकथन, मानसिक आजार व उपचार यासारख्या गुढ गोष्टीची नीट उघड चर्चा व चिकित्सा होण्याची गरज आहे. माणसाला विज्ञान नीट समजायला हवे पण माणूस म्हणून जगण्याची कलाही अवगत व्हायला पाहिजे अशी संधी मिळायला पाहिजे.

ज्या मिथकांचा जनमानसावर शेकडो वर्षापासून पगडा बसलेला असतो आणि त्यामुळे त्यांच्या अंधश्रद्धांना खतपाणी मिळते अशी मिथके उध्वस्त करण्याचे कार्य प्रत्येक काळातील अंधश्रद्धा निर्मूलनकांना करावेच लागते. सामाजिक क्रांतीचे शिल्पकार ज्योतिराव फुले यांनी भंजनाचे हे कार्य अत्यंत समर्थपणे पार पाडली आहे. सर्वच अवतारांच्या कथा ज्योतिरावांनी आर्य-अनार्य संघर्षाची आणि त्यातील आर्यांच्या रणनीतीशी जोडल्या आहेत. शूद्रातिशूद्रांना या कहाण्या नीट तपासून आपला खरा पूर्वेतिहास समजून घ्यावा आणि आपल्या हीच शत्रूंच्या दुष्ट हेतूंना फसवू नये हा जोतीरावांच्या उद्देश यामागे स्पष्ट दिसतो.

बुद्धिप्रामाण्य, धर्माची समाजशास्त्रीय विश्लेषण आणि इहवादी दृष्टिकोन ही जोतीरावांच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्याची तत्त्व वैचारिक त्रिसूत्री म्हणता येईल.[3] विश्वातील इतर सर्व पशु प्राण्यापेक्षा मानव प्राण्याचे वेगळेपण जर कशात असेल तर ते त्याच्या सारासारविचार करण्याच्या क्षमतेत आहे हे जोतिरावांनी आवर्जून सांगितले आहे. प्रारब्ध, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, सदगती, कर्मविपाक वगैरे कल्पना मधील फुल पणा पटवून देताना माणसाच्या ऐहिक जीवनाचे प्राधान्य त्यांनी अधोरेखित केले आहे. त्यांनी चाळीस वर्ष धर्मचिकित्सा केली. अनेक व्याख्याने दिली. वाद-विवाद केले धर्माच्या नावाखाली लोकांची होत असलेली विविधांगी फसवणूक थांबवावी यासाठी परोपरीने प्रयत्न केले जोतीरावांच्या लेखनात तिखटपणा भरपूर असला तरी त्यांच्या स्वभावात व्यक्ती द्वेषाचा किंवा जाती द्वेषाचा लवलेशही नव्हता ते खऱ्या अर्थाने सत्यशोधक होते. त्यांना अभिप्रेत असलेला धर्म सत्य धर्म तर होताच पण त्याचबरोबर तो सार्वजनिक होता. नैतिकतेचा प्रवास हा त्यांचा शोध होता तीच त्यांच्यासाठी ही जीवन व्यापी प्रेरणा होती. धर्माविषयीचे परखड व मूर्तिभंजक चिंतन ज्योतिरावांनी सादर केले असले तरी ते पाखंडी किंवा नास्तिक नव्हते अशी प्रबोधनकार ठाकरे यांनी गवाही दिली आहे. तर्क, विवेक आणि समतेचे तत्व या निकषावर प्रत्येक धर्मग्रंथातील तरतूद तपासण्याची शिफारस त्यांनी केली.[4]

ईश्वर आणि धर्म यासंबंधी आपण कोणती भूमिका घ्यावी यावर आजही अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये बरीच  मतमतांतरे आढळतात. ज्योतिरावांचे ईश्वर विषयक धर्मविषयक विचार आजच्या चळवळीला बरेचसे बरेच मार्गदर्शक ठरू शकतील. जोतीरावांच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्यापासून आजच्या त्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांना चळवळीचे नेतृत्व चळवळीची तंत्रे, संघटना बांधणी अशा कित्येक गोष्टी शिकता येण्यासारखे आहेत. अंधश्रद्धेचे मूळ अज्ञानात आहे आणि अज्ञान दूर होताच अंधश्रद्धांचे निर्मूलन होईल असा किती ज्योतीरावांचा निष्कर्ष होता. आजही अशिक्षित आई तितकीच गरज सुशिक्षितांच्या अंधश्रद्धा दूर करण्याची आढळते. दारिद्य आर्थिक विषमता, शोषण आणि मागासलेपण संपवण्याचा क्रांतिकारी चळवळीशी सांधेजोड झाली तरच ती यशस्वी होऊ शकेल.

**संदर्भसूची:-**

1. नरके हरी, आम्ही पाहिलेले फुले महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन मुंबई 1993 पृ.क्र.55.
2. फडके य. दि., (संपादक) महात्मा फुले समग्र वांग्मय, सुधारित चौथी आवृत्ती,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ,मुंबई-1991 पृ. क्र. 566
3. सरदार ग. बा.आणि इतर, महात्मा फुले: प्रेरणा व तत्त्वज्ञ महात्मा फुले प्रतिष्ठान प्रकाशन, मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद 1990 पृष्ठ क्र. 48
4. भोळे भास्कर लक्ष्मण, महात्मा जोतीराव फुले वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन, दुसरी आवृत्ती, 2001 पृष्ठ क्र. 243